# जाहीर सूचना

## नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळात सुरक्षा रक्षकांचा (नागपूर, वर्धा, गोंदिया व भंडारा जिल्ह्याकरिता) समुच्चय (पूल) तयार करण्यासाठी जाहिरात

नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या कार्यक्षेत्रातील (नागपूर, वर्धा, गोंदिया व भंडारा जिल्ह्याकरिता) नोंदीत मुख्य मालक/नियोक्त्यांना (कारखाने, आस्थापना, शासकीय निमशासकीय मंडळे, महामंडळे कार्यालय इत्यादी) मागणीनुसार सुरक्षा रक्षक पुरविण्याकरित ३१७ सुरक्षा रक्षकांचा समुच्चय (पूल) तयार करावयाचा आहे, त्याकरिता जाहिरात प्रसिद्ध करणे आहे.

सदर समुच्चय (पूल) तयार करण्यासाठी शासन निर्णय क्र.एसजीए-२०२४/प्र.क्र.९६/कामगार-५ दि. २७.०३.२०२५ अन्वये उमेदवारांच्या पात्रतेच्या अटी http://www.sgbregistration.in या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या असून इच्छुक व पात्र उमेदवारांनी सदर संकेतस्थळावर दिनांक २९.०४.२०२६ ते २८.०५.२०२६ चे कार्यालयीन वेळ सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत अर्ज करावे.

सुरक्षा रक्षकांची नोंदणी करण्याकरिता आवश्यक असलेले पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे :-

१) वयोमर्यादा :- उमेदवाराचे किमान वय १८ वर्ष व कमाल वय ३५ वर्ष असेल.
२) शैक्षणिक पात्रता :- वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध झालेल्या दिनांकावेळी उमेदवाराने उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (१२वी) उत्तीर्ण असणे आवश्यक राहील.
३) अधिवास :- सदर उमेदवारांकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) असणे आवश्यक आहे.
४) शारीरिक पात्रता :-

| | पुरुष उमेदवार | महिला उमेदवार |
|---|---|---|
| उंची | किमान १६५ सें.मी. | किमान १५८ सें.मी. |
| वजन | ५० किलो ग्रॅम | ४५ किलो ग्रॅम |
| छाती | ७९ सें.मी. न फुगवता, फुगवून ८४ सें.मी. | ---- |

५) उपरोक्त नमूद वय, शिक्षण व शारीरिक पात्रतेच्या निकषाप्रमाणे पात्रता नसल्यास उमेदवारांचा पुढील प्रक्रियेकरिता विचार केला जाणार नाही.

उपरोक्तप्रमाणे निकषात बसणाऱ्या उमेदवारांची मैदानी परीक्षा खालीलप्रमाणे असेल :-

१. मैदानी चाचणी ही एकूण १०० गुणांची असेल व मैदानी चाचणीत उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५०% गुण मिळणे आवश्यक आहे.
२. मैदानी चाचणीमध्ये अनुत्तीर्ण अर्जदारांचा अंतिम गुणवत्ता यादीकरिता विचार केला जाणार नाही.
३. मैदानी चाचणीत एकुण गुणांची बेरीज अपूर्णांकात असल्यास ती अपूर्णांकातच ठेवून, मैदानी चाचणीचा निकाल तयार करण्यात येईल.
४. मैदानी परीक्षा :- एकुण गुण १००

| अ.क्र. | पुरुष उमेदवार | महिला उमेदवार | गुण | टीप |
|---|---|---|---|---|
| १ | १६०० मीटर धावणे | ८०० मीटर धावणे | ४० | १६०० मीटर अंतर पूर्ण करण्यास लागलेल्या कालावधीनुसार गुण मिळतील. याबाबत दि. २७.०३.२०२५ चे शासन निर्णयात विस्तृत माहिती दिलेली आहे. |
| २ | १०० मीटर धावणे | १०० मीटर धावणे | ३० | वरीलप्रमाणे |
| ३ | गोळाफेक (७.२६० किलो. वजनाचा) | गोळाफेक (४ किलो. वजनाचा) | ३० | ७.२६० किलोग्रॅम वजनाचा गोळा फेकण्याकरिता किती अंतर गोळा फेकला त्यानुसार गुण मिळतील. याबाबत दि. २७.०३.२०२५ चे शासन निर्णयात विस्तृत माहिती दिलेली आहे. |

''मैदानी परीक्षेदरम्यान काही अपघात झाल्यास अथवा अघटीत प्रसंग ओढवल्यास संबंधित मंडळ न्यास जबाबदार राहणार नाही, याची अर्जदाराने नोंद घ्यावी, तसे हमीपत्र अर्जदाराने मंडळास सादर करणे बंधनकारक राहील. हमीपत्र सादर केल्यानंतरच अर्जदारास मैदानी परीक्षेमध्ये सहभागी होता येईल.''

सुरक्षा रक्षकांच्या नोंदणी प्रक्रियेत खालील विशेष अर्हताप्राप्त उमेदवारांना द्यावयाचे अधिकचे गुण, सदर अधिकचे गुण जास्तीत जास्त १० गुण या मर्यादेपर्यंत ग्राह्य धरण्यात येतील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | एम.एस.सी.आय.टी. (MS-CIT) | | - | ४ गुण |
| २) | एन.सी.सी. (N.C.C.) | अ प्रमाणपत्र | - | २ गुण |
| | | ब प्रमाणपत्र | - | ४ गुण |
| | | क प्रमाणपत्र | - | ६ गुण |

अ) उमेदवारांना अर्ज भरण्याकरिता शासन निर्णय क्रमांक एसजीए-२०१७/प्र.क्र.९९/कामगार-५ दि. १०.१०.२०१८ नुसार खुल्या प्रवर्गाकरिता रु. १००/- व टॅक्स तर मागासवर्गीय प्रवर्गाकरिता रु. ७५/- व टॅक्स निश्चित केलेले आहे. सदर शुल्क उमेदवारांना भरणे आवश्यक राहील.
ब) एका सुरक्षा रक्षक मंडळातून दुसऱ्या सुरक्षा रक्षक मंडळात बदली करण्यास कोणताही सुरक्षा रक्षक पात्र असणार नाही.
क) सुरक्षा रक्षक वयाची ५८ वर्षे पूर्ण होईपर्यंत सुरक्षा रक्षक मंडळामध्ये कार्यरत राहील. त्यापुढे कोणत्याही परिस्थितीत सुरक्षा रक्षक म्हणून काम करता येणार नाही.
ड) ज्या आस्थापनेने सुरक्षा रक्षक मंडळाकडे सुरक्षा रक्षक पुरविण्याबाबत मागणी केली असेल त्या आस्थापनेसाठी ज्यांची जमीन संपादित झाली आहे अशा प्रकल्पग्रस्त कुटुंबातील घटकांच्या पात्र उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

सदर समुच्चय (पूल) तयार करणे ही थेट भरती नाही, त्यामुळे समुच्चयासाठी पात्र उमेदवारांना नोकरीची हमी देता येणार नाही. मात्र ज्या प्रमाणात आस्थापनांकडून मागणी उपलब्ध होईल, त्यानुसार पात्र सुरक्षा रक्षकांना मंडळाचे कार्यक्षेत्रांतर्गत (नागपूर, वर्धा, गोंदिया व भंडारा) कामासाठी वितरीत केले जाईल. सदर प्रक्रिया पारदर्शक संगणकीकृत होणार असून इच्छुक उमेदवारांनी त्रयस्थ व्यक्तींच्या कोणत्याही प्रलोभनास बळी पडून नये किंवा संपर्क करू नये, असे जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

**टीप :** यापूर्वी ज्या उमेदवारांनी सुरक्षा रक्षकांच्या नोंदणी/भरतीकरिता ऑनलाइन अर्ज केलेले आहेत त्यांनादेखील पुन्हा नव्याने अर्ज करणे अनिवार्य आहे याची नोंद घ्यावी.

स्वा/-
**(उ. सु. लोया)**
**अध्यक्ष,**
**नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नागपूर**

**(DGIPR-2026-27/क्र.5/C-481)**

Mahabharti.in